चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
०३ एप्रिल, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# गैरकायदयाची मंडळी जमवुन दंगा करणाऱ्या आरोपीतांना न्यायालयाने ठोठावली शिक्षा

पोलीस स्टेशन राजुरा अंतर्गत अंबुजा सिमेंट फॅक्टरी आणि पोलीसांवर गैरकायदयाची मंडळी जमवुन हल्ला करणाऱ्या आरोपीतांना ०२/०४/२०१९ रोजी **श्री. डि.के. भेंडे जिल्हा सत्र न्यायाधीश क्र. १ चंद्रपुर यांनी शिक्षा ठोठावली आहे.**

पोलीस स्टेशन राजुरा अंतर्गत अंबुजा सिमेंट फॅक्टरी येथे यातील आरोपी नामे वेदांत वसंतराव मेहकुरे वय ३५ रा.+४२ सर्व रा. राजुरा यांनी सिमेंट कंपनी व्यवस्थापनात आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी दि. ०४/०२/२००९ रोजी फॅक्टरी जवळ अकस्मात गैरकायदयाची मंडळी जमवुन व्यवस्थापनाला अश्लिल शिवीगाळ केली आणि पोलीस प्रशासन त्यांना शांत करण्यासाठी आले असता पोलीसांवर दगडफेक करून शासकीय सामानाचे नुकसान केले. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन राजुरा येथे अप.क्र. १८/२००९ कलम १४७, १४३, १४९, ३५३, ३०७ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरिक्षक श्री. एम. डी. शरणागत पोस्टे राजुरा यांनी पुर्ण करून आरोपी विरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ०२/०४/२०१९ रोजी **आरोपी नामे वेदांत वसंतराव मेहकुरे वय ३५ रा.+४२ सर्व रा. राजुरा यांना आर्थिक दंडाची शिक्षा आणि दंड न भरल्यास ३ दिवस कारावासाची शिक्षा श्री.डि. के. भेंडे जिल्हा सत्र न्यायाधीश क्र. १ चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणात सरकार तर्फे **ॲड. एस. आर. देगावार, सरकारी अभियोक्ता, तर कोर्ट पैरवी म्हणुन नापोका सुखदेव मेश्राम, पोस्टे राजुरा** यांनी काम पाहिले.

---

# शुल्लक कारणावरून मारहाण करणाऱ्या आरोपींना कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन चिमुर अंतर्गत शुल्लक कारणावरून दगडाने वार करून जखमी करणाऱ्या आरोपीतांना ०२/०४/२०१९ रोजी **श्री. छल्लानी जेएमएफसी कोर्ट चिमुर यांनी शिक्षा ठोठावली आहे.**

पोलीस स्टेशन चिमुर अंतर्गत मौजा सावरगांव येथे यातील फिर्यादी नामे नंदु दसरथ सावसागडे वय ४६ रा. सावरगाव चिमुर यांच्या घरी असलेल्या बकरीच्या पिल्लांनी यातील **आरोपी नामे १) मोरेश्वर श्रावण पोहणीकर वय ४५, २) नितेश मोरेश्वर पोहणीकर वय २२ दोन्ही रा. सावरगाव चिमुर** यांच्या घरातील कुंपणावरील वेली खाल्याने आरोपीतांनी फिर्यादीसोबत भांडण केले आणि फिर्यादीवर दगडाने वार करून जखमी केले. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट आणि मेडिकल रिपोर्टवरून पोलीस स्टेशन चिमुर येथे अप.क्र. १०३/२०१४ कलम ३२४, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास सहायक पोलीस निरिक्षक श्री. के.टी. कांबळे, पोस्टे चिमुर यांनी पुर्ण करून आरोपी विरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ०२/०४/२०१९ रोजी **आरोपी नामे १) मोरेश्वर श्रावण पोहणीकर वय ४५, २) नितेश मोरेश्वर पोहणीकर वय २२ दोन्ही रा. सावरगाव चिमुर यांना आर्थिक दंडाची शिक्षा आणि दंड न भरल्यास ३ दिवस कारावासाची शिक्षा श्री.डि.के. भेंडे जिल्हा सत्र न्यायाधीश क्र. १ चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणात सरकार तर्फे **ॲड. एस. आर. देगावार, सरकारी अभियोक्ता, तर कोर्ट पैरवी म्हणुन नापोका सुखदेव मेश्राम, पोस्टे राजुरा** यांनी काम पाहिले.

---